# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम-४१४/२०१९

**तक्रारकर्ता श्री. डॉन. एन. ठाकूर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्र. सह. जिल्हा निबंधक वर्ग-२**
जुने जकात घर, तळ मजला, शाहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई -२३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. सह जिल्हा निबंधक वर्ग-१**
जुने जकात घर, तळ मजला, शाहिद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई -२३

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.MHSICMU/२०१९/M/००१३४५ प्रकरणी आयोगाने दि.१०.०६.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

१) "जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अभिलेखाचा पुन्हा शोध घ्यावा व अपिलार्थीना कळवावे.
२) जर संबंधीत दस्ताची कार्यालयीन प्रत मिळाली नाही तर त्या आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करावे व त्याची एक प्रत अपिलार्थी यांना द्यावी.
३) अपील निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १५.०९.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा प्र. सह. जिल्हा निबंधक वर्ग- २ (अभिलेख विभाग), जुने जकात घर, फोर्ट, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १६.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा प्र. सह. जिल्हा निबंधक वर्ग- २ (अभिलेख विभाग), जुने जकात घर, फोर्ट, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. १०.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले की, दस्त क्र. बॉम २०८२/१९७५ च्या कार्यालयीन प्रतीचा आढळ झालेला असून सदरच्या दस्ताच्या कार्यालयीन प्रतीचे शेवटच्या पानाचा आढळ होत नाही.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दिलेले पत्र दि. ०६.११.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्रात नमूद केले की, दस्त क्र. एस

..२/-

२०८२/१९७५ ची सद्यस्थितीत या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली १४ पानांची प्रत अपिलार्थीस पत्रासोबत माहिती अधिकार अंतर्गत पुरविण्यात येत आहे. तसेच संपुर्ण प्रत शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर आपणास पुरविण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयाकडून प्रत प्राप्त करण्याकरीता शासनाने शुल्क निश्चित केलेले आहे आणि तक्रारकर्ता यांनी तसे शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देता येईल.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना ८ दिवसांत आवश्यक शुल्काची रक्कम कळवावी व त्याप्रमाणे तक्रारकर्ता यांनी शुल्क भरल्यानंतर १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढीलआदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**